D:\APA-2021\Letter 2021.doc

# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ


कृषि नगर, वसमत रोड, परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
|---|---|---|---|
| वेबसाईट | : www.vnmkv.nic.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


वाचा : १. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, दिनांक १५ मार्च २०१४
२. महाराष्ट्र शासन पत्र क्र.संकीर्ण-१५१७/प्र.क्र.९४/६-अे दिनांक २०.७.२०१९
३. कृषि परिषद पुणे यांचे पत्र क्र.मकृप/मकृसेमं/कॅस/२०६/२०१८ दिनांक ३०.११.२०१८
४. कृषि परिषद पुणे यांचे पत्र क्र.मकृप/मकृसेमं/कॅस/५२१/२०१९ दिनांक ३१.१२.२०१९

## विद्यापीठ परिपत्रक

**क्रमांक २०२१/CAS Circular stage 4 to 5/ प्र.क्र.१२१३/आस्था-१,** /2808
कुलसचिव कार्यालय, वनामकृवि, परभणी
दिनांक ३१.७.२०२१

विद्यापीठातील सर्व शिक्षक वर्गीय अधिकारी/ कर्मचारी यांना कळविण्यात येते की, कारकीर्द प्रगती योजनेंतर्गत पायरी-४ ते ५ (ग्रेड वेतन ९००० ते १००००) वेतनश्रेणी कृषि परिषदेकडून प्रदान करण्यात येत असते. शासन शुध्दीपत्रक दि.२०.९.२०१० नुसार अतिरिक्त प्रदान झालेले लाभ वसूल करण्याबाबतची कार्यवाही प्रलंबीत असल्यामुळे विद्यापीठाने प्रस्ताव मागविले नव्हते.

परंतू संदर्भ क्र.३ व ४ अन्वये कृषि परिषद, पुणे यांच्याकडून सदर प्रस्ताव मागविण्याबाबत पाठपुरावा करीत आहेत. त्यावर मा.कुलगूरु महोदय यांनी दिनांक ३१.३.२०१४ नंतर वेतनश्रेणी रु. ३७४००-६७००० ग्रेड वेतन ९०००/- या वेतनश्रेणी मध्ये नियुक्त शिक्षकवर्गीय अधिका-यांचे टप्पा ४ वरून ५ मधील म्हणजेच रु.१०००० ग्रेड वेतन देण्यासाठी प्रस्ताव मागविण्यास मान्यता प्रदान केली आहे.

त्या अनुषंगाने पात्र शिक्षक वर्गीय अधिकाऱ्यांकडून दिनांक ३१.८.२०२१ पर्यंत प्रस्ताव तयार करण्याकरीता विद्यापीठ परिपत्रक क्रमांक २०२१/CAS Circular / प्र.क्र.१२१२/आस्था-१ दिनांक २२.७.२०२१ सोबत जोडलेल्या नियमावली नुसार व संदर्भीय शासन अधिसूचना दिनांक १५ मार्च २०१४ मध्ये दिलेल्या विहीत नमून्यात आपला प्रस्ताव (Biodata) सहपत्रासह दिनांक ३१.८.२०२१ पूर्वी या कार्यालयास सादर करावेत.

प्रस्ताव विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास अथवा विद्यापीठ नियमावलीनुसार प्रस्ताव प्राप्त न झाल्यास स्विकारले जाणार नाहीत. तसेच एकदा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर अधिकचे कागदपत्रे स्विकारले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

प्रस्ताव सादर करतांना नियमावलीचे तंतोतंत पालन केल्याचे तसेच वेतनश्रेणी बहाल करण्यासाठी आवश्यक अटी पूर्ण करतात किंवा नाही याची शहानिशा संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांनी त्यांचे स्तरावर करून घ्यावी व त्यानंतरच प्रस्ताव साक्षांकित करून प्रस्ताव परिपूर्ण असल्याचे समाधान झाल्यानंतरच वरिष्ठ कार्यालयास सादर करावेत. यामध्ये हलगर्जीपणा झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित शिक्षकवर्गीय अधिका-याची व प्रस्ताव साक्षांकित करणारे नियंत्रण अधिकारी यांची राहील याची नोंद घ्यावी.

मा.कुलगुरू यांच्या मान्यतेने,

31/7/21

(धिरजकुमार रा. कदम)
**कुलसचिव**

**प्रतिलिपी**

१. मा.महासंचालक, कृषि परिषद तथा सचिव,महाराष्ट्र कृषि विद्यापीठे सेवा प्रवेश मंडळ, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,१३२/ब, भांबुर्डा, भोसले नगर, पुणे-४११ ००७.

प्रत :

१. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांना देवून निर्देशीत करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
२. मा.कुलगुरू यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी